# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२० / फाल्गुन २३, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**<br>**(३) अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**<br>**(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**<br>**(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री**<br>**(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

---

### राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक तसेच पदधारकांना नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१) * २२४ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ३२६ कंत्राटी निदेशकांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १७/०१/२०१८ रोजी मा.मंत्रिमंडळासमोर आदेशार्थ सादर करण्यात आला असता मा.मंत्रिमंडळाने कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अखत्यारीतील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ३२६ कंत्राटी निदेशकांना नियमित सेवेत सामावून घेण्याच्या प्रस्तावासंबंधी वेगवेगळ्या प्रकारच्या तरतुदी व

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या निर्णयाचा विचार व परिपूर्ण अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी तत्कालीन मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मंत्रिमंडळ उपसमितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, उपसमितीने अहवालात केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशकांना तसेच अन्य प्रशासकीय विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी पदधारकांना नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, उपसमितीने ३२६ कंत्राटी निदेशकांना नियमित सेवेत सामावून घेणेकरीता विभागाने प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात यावा, असे नमूद केले होते. तथापि, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तसेच सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे आदेश विचारात घेता पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील + २ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे दोन्ही निर्णय रद्द करण्याबाबत

**(२) * ४७३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (एच.एस.सी. व्होकेशनल) संस्थेच्या निरीक्षण करण्याच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेतील निरीक्षणाच्या प्रक्रिया थांबविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखीपत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील +२ स्तरावरील आधारीत एच.एस.सी. व्होकेशनल व दिल्ली अभ्यासक्रमाकडील पूर्ण वेळ शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी व्होकेशनल इन्स्ट्रक्टर्स टीचर्स असोसिएशन तर्फे दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास विधीमंडळावर मोर्चा काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार ४६०० ग्रेड पे मंजूर करण्यात यावा, व्यवसाय अभ्यासक्रमाचे रुपांतरण व निरीक्षण रद्द करावे या प्रमुख मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दोन्ही निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) इन्स्ट्रक्टर्स टीचर्स असोसिएशन तर्फे दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी विधीमंडळावर मोर्चा काढण्याबाबत निवेदन दिले होते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) एच.एस.सी.व्होकेशनल (एम.सी.व्ही.सी.) शिक्षक निदेशकांच्या प्रश्नाबाबत मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत एच.एस.सी. व्होकेशनलचे रुपांतर करण्यासंदर्भात नविन समिती नेमण्यात यावी व या नविन समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे ठरले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३) * १००८ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ देण्यासाठी शासनाने आश्वासित प्रगती योजना लागू केली असून सदर योजनेंतर्गत २४ वर्षाच्या सेवेनंतर मिळणारा दुसरा लाभ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी शासनाने कोणतेही आदेश न दिल्याने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने नियमानुसार मिळणारा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे आदेश पारीत केले असून न्यायालयीन आदेशानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाने आदेश न देण्याची कारणे काय आहेत, याबाबतचे आदेश केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, दिनांक ३०/०४/१९९८ अन्वये केवळ १२ वर्षाच्या सेवेनंतर देय असणारी कालबद्द पदोन्नती योजना लागू आहे. २४ वर्षाच्या सेवेनंतर देय असणारी आश्वासित प्रगती योजना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप लागू करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३३४/२०१८ मध्ये दिनांक ०४/१०/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयात विधी व न्याय विभागाने दिलेल्या परवानगीनुसार पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. यानुसार मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ६३२३/२०१८ व याचिका क्र. ८४३९/२०१८ मध्ये दिनांक १५/०७/२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरूध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षक भरती सुरू करण्याबाबत

**(४) * १७१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक भरती पवित्र प्रणालीमार्फत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरतीमध्ये कला, कार्यानुभव व क्रीडा शिक्षकांची भरती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची भरती सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) संचमान्यतेनुसार रिक्त पदांवर शैक्षणिक संस्थांच्या मागणीनुसार पद भरती करण्यात येत आहे.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मुल्यांकनाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * ३८ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे बंगळुरु येथील नॅशनल अॅक्रेडीटेशन अॅण्ड अॅसेसमेंट कौन्सिल (नॅक) मार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मुल्यांकन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल्यांकनासाठी २२ विभागामधील विविध विभागातील डागडूजीच्या कामासाठी रुपये ८ कोटी खर्च करुन ५ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असून कुलपती कार्यालयाने मा.कुलगुरुंच्या अधिकाराचे उल्लंघन करुन २७ कामांना वाढत्या दराने मंजूरी देऊन आर्थिक गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्यापीठातील विविध इमारतीच्या देखभाल दुरुस्तीची कामे सन २०१६ ते २०१९ या कालावधीत झालेली असून इमारत व बांधकाम समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत त्या त्या वेळेस मान्यता घेऊन करण्यात आलेली आहेत.

(३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबतची बातमी वर्तमान पत्रात छापून आल्याने सदर बातमीच्या आधारे नॅकच्या अनुषंगाने केलेल्या कामाची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार समिती गठीत केली असून

व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सदर समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप विद्यापीठास अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(६) * १२४५ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षक सेवकांचे मानधन सुरुवातीला रुपये ३०००/-, माध्यमिक शिक्षकांचे रुपये ४,०००/- व उच्च माध्यमिक शिक्षकांचे रुपये ५,०००/- असून सन २०१२ नंतर प्राथमिक शिक्षक रुपये ६,०००/-, माध्यमिक शिक्षकांना रुपये ६,०००/- तसेच उच्च माध्यमिक शिक्षकांना रुपये १२,०००/- मानधन देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढती महागाई लक्षात घेता सदर मानधनात वाढ करुन शिक्षक सेवकांची योजना रद्द करून सहायक शिक्षकाची पद भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) अद्याप शासनस्तरावर सदर बाब विचाराधीन नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून महामंडळाची फसवणूक होत असल्याबाबत

**(७) * १२३५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाडनाका, खेड येथे राज्य परिवहन महामंडळाला बसस्थानक उभारण्यासाठी शासनाने दिलेल्या भुखंडाचा वापर व्यावसायिक वापरासाठी होत असल्याने महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून महामंडळाची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) सदर भुखंडावर राज्य परिवहन महामंडळाचे नवीन बसस्थानक बांधणेसाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदर भूखंड रिक्त असल्याने सामाजिक/धार्मिक/शासकीय/ शैक्षणिक कारणासाठी शासन परिपत्रकानुसार योग्य शुल्क आकारुन सदर भूखंड वापरास दिला जात आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग समावेशित विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(८) * ७११ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत सन २००९ नंतर नियुक्त विशेष शिक्षक व परिचर यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार तसेच मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार अन्य शाळेत समायोजन न केल्याबाबत तसेच वेतनाची थकबाकी अदा न केल्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ रोजी मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथ/माध्य.) यांना पत्र पाठवून दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत सन २००९ नंतर नियुक्त विशेष शिक्षक व परिचर यांना अतिरिक्त ठरवून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेने अधिनस्त स्थानिक स्वराज्य संस्थाव्दारे शाळेतील रिक्त पदी समायोजन करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद अपंग समावेशित विशेष शिक्षक संघटनेच्या माध्यमातून व लोकप्रतिनिधी या नात्याने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी करुनही सदरहू प्रकरण प्रलंबित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंग समावेशित शिक्षक यांना माध्यमिक स्तरावर अंतर्गत विशेष शिक्षक आणि परिचर यांचे थकित वेतन जमा करून त्यांचे समायोजन करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस शासन दिरंगाई करीत आहे, तसेच सदरहू प्रकरणे प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विशेष शिक्षकांच्या समायोजनाचा व थकीत नियमित वेतनाचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२), (३) व (४) अंशतः खरे आहे, अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) या योजनेतील कार्यरत विशेष शिक्षकांची समायोजनाची मागणी असून त्यासंदर्भात योजनेंतर्गत कार्यरत असलेले कोणते विशेष शिक्षक समायोजनासाठी पात्र आहेत हे निश्चित करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तपासणी पथक नेमण्यात आले असून त्यांचेमार्फ़त तपासणी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत

**(९) * ६५३ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत मिळण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती आणि डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रुपये २९०० कोटी शिष्यवृत्तीपैकी रुपये १२०५ कोटी खर्च करण्यात आल्याचे तत्कालीन मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी घोषित केले असून उर्वरित रुपये १६९५ कोटी शिष्यवृत्ती दिली नसल्याचे माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना अदा न करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेबाबत पाठपुरावा करुन उर्वरित शिष्यवृत्तीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन योजनांवर सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या ५ वर्षाच्या कालावधीत रुपये २४५७.४१ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

तसेच सन २०१९-२०२० मध्ये या दोन्ही योजनांसाठी एकूण रुपये ८०६.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०२० अखेर रुपये ४००.६१ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. तसेच उर्वरित रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्रमाणपत्रामध्ये चुका झाल्याबाबत

**(१०) * ३२६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील उच्च व माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्रमाणपत्रामध्ये अधिक प्रमाणात चुका झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुणपत्रिका प्रमाणपत्रामधील चुक दुरुस्तीकरीता चार-चार महिने विद्यार्थ्यांना विभागीय कार्यालयात जावे लागते तसेच शिक्षण मंडळाने तयार केलेली यादी संबंधित शाळा मुख्याध्यापकाकडून कालमर्यादेत नाव दुरुस्ती केली जात नसल्याने शिक्षण मंडळाच्या अनागोंदी कारभारामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षण मंडळाने गुणपत्रिका प्रमाणपत्रामध्ये चुका दुरुस्तीकरीता कालमर्यादा निश्चित करुन विनामुल्य व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नागपूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रात त्रुटी निदर्शनास आल्यामुळे सदर प्रमाणपत्राचे वाटप न करता ते जमा करून सुधारीत प्रमाणपत्रांचे संबंधितांना विनामुल्य वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फॅट स्प्रेडच्या तीन ब्रॅन्डचा माल अन्न व औषध प्रशासनाने जप्त केल्याबाबत

**(११) * १२२७ श्री.प्रविण दरेकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पनवेल, भिवंडी, नाशिक आणि औरंगाबाद येथून अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहिमेंतर्गत गुप्त वार्ता (अन्न) विभागाने न्युट्रालाईट फॅट स्प्रेड, डिलीसीयस फॅट स्प्रेड ॲण्ड अमुल लाइय फॅट स्प्रेड अन्न पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या नामांकीत पेढ्यांच्या विविध ठिकाणी असणाऱ्या कोल्ड स्टोरेजवर छापा टाकून एकूण ६९ लाख ३४ हजार २३२ रुपयांचा साठा जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीने झीरो कोलेस्ट्रॉल, लो फॅट, लो कोलेस्ट्रॉल अशी जाहिरात उत्पादनांवर करुन उत्पादन विकणे हे अन्न सुरक्षा कायद्याने गुन्हा असल्याने न्युट्रालाईट, डिलीसीयस, अमुल ब्रॅण्डकडून नियमाचे उल्लंघन केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनी तसेच दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागातील अधिकाऱ्यांनी दिनांक ०२/०१/२०२० ते दिनांक १०/०१/२०२० या कालावधीत न्युट्रालाईट फॅट स्प्रेड, डिलीसीयस फॅट स्प्रेड ॲण्ड अमुल लाइय फॅट स्प्रेड या अन्न पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या नामांकित पेढ्यांच्या राज्यातील पनवेल, गोरेगाव (मुंबई), भिवंडी, नाशिक, औरंगाबाद, पुणे येथे असलेल्या कोल्ड स्टोरेजवर धाडी टाकुन फॅट स्प्रेड या अन्न पदार्थांचा एकूण रुपये ०१,०३,१९,९८२/- किंमतीचा साठा जप्त केलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर कारवाईच्या वेळी घेण्यात आलेल्या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले आहेत. सदर विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर चौकशीअंती सर्व संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कायदेशीर कारवाई घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) * ४५६ श्री.रमेशदादा पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४१८९८ ला दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमधील रसायनयुक्त सांडपाणी प्रक्रिया न करता खाडीमध्ये सोडल्याने खाडीचे पाणी दूषित होऊन मासे मृत्यूमुखी पडल्याने मत्स्यबीज नष्ट होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उद्योगातील दूषित पाण्यामुळे मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छीमार कोळी बांधवांचे नुकसान होत असल्याने मच्छीमारांना नुकसान भरपाई देवून संबंधित उद्योजकांवर सांडपाण्याविषयी निर्बंध लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण शहरातील ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) * १०९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्‍या चव्हाण :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे पहिले आरमार उभारलेल्या कल्याण खाडी किनाऱ्यालगत असलेल्या दुर्गाडी किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाने रुपये ३ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीमधील केवळ रुपये २५ लाख वितरीत करण्यात आल्याने किल्ल्याच्या डागडुजीचे काम मागील दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंजूर निधीपैकी उर्वरित निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०१६-२०१७ अंतर्गत कल्याण (पश्चिम) येथील दुर्गाडी किल्ल्याची डागडुजी करण्याच्या रुपये १७९.०० लक्षच्या कामास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) कल्याण (पश्चिम) येथील दुर्गाडी किल्ल्याची डागडुजी करण्याच्या कामासाठी रुपये १७९.०० लक्षच्या कामास मंजूरी देऊन रुपये २५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर कामासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार व राज्य पर्यटन विकास समितीच्या मान्यतेने उर्वरित निधी वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(१४) * १०५६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० वी नंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आय.टी.आय.) डिप्लोमा अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेत २९.९७९ जागा रिक्त असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून त्यात अमरावतीतील रिक्त जागांची संख्या २.१६२ इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील डिप्लोमा अभ्यासक्रमांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या ऑगस्ट, २०१९ च्या प्रवेश प्रक्रियेत एकूण २९,९११ इतक्या जागा रिक्त आहेत. यापैकी अमरावती विभागात २,१६२ इतक्या जागा रिक्त आहेत.

(२) व (३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशप्रक्रियेत उमेदवारांचा अधिकाधिक प्रतिसाद लाभण्यासाठी विभागाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असते.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील गाव तलाव व विहिरींमधील गाळ काढणेबाबत

**(१५) * ८६६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये तलाव व सार्वजनिक विहिरींमधील पाण्याचा वापर घरगुती वापरासाठी तसेच जनावरांना पिण्यासाठी केला जात असून रायगड जिल्ह्यातील विशेष करून दुष्काळी भागातील ग्रामस्थ हे तलावातील व विहिरीमधील पाण्याचा वापर करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमधील तलाव व सार्वजनिक विहिरींमधील गाळ अनेक वर्षांपासून काढण्यात न आल्यामुळे त्यामधील पाण्याच्या साठवणुकीची क्षमता कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्ह्यामधील तलाव व सार्वजनिक विहिरींमधील गाळ काढण्यासाठी तसेच सुशोभिकरणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत ७ गावतळी व १८ विहिरींमधील गाळ काढण्यात आलेला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पेण तालुक्यातील तांबडशेत तलावातील गाळ काढण्याचे काम ग्रामपंचायत जोहेमार्फत करण्यात आले आहे.

जिल्ह्याचा ऑक्टोबर, २०१९ ते जून, २०२० चा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार केला असून सदर आराखड्यामध्ये जिल्ह्यातील १३ गावे व ४८ वाड्या अशा एकूण ६१ ठिकाणच्या विहिरीतील गाळ काढण्याची कामे समाविष्ट करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) * ५१० डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, राजपत्रित अधीक्षक, कक्ष अधिकारी या पदावर प्रभारी कार्यरत असल्याने येथील कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण राहत नसल्यामुळे विभागातील कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर विभागातील सर्व महत्त्वाची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

(२) रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील विधवा निराधार स्वावलंबन योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) * १२१० श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात शासनातर्फे शेतकरी विधवा निराधार स्वावलंबन योजना सुरु करण्यात आली असून मागील ३ वर्षापासून सदर योजनेसाठी निधी न मिळाल्यामुळे सुमारे हजारो लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नागपूर जिल्ह्यातील विधवा निराधार योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) नागपूर जिल्ह्यातील शेतकरी विधवा निराधार स्वावलंबन योजना या विभागाव्दारे लागू करण्यात आलेली नाही. तथापि, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवासाठी नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याच्यादृष्टीने “विशेष बाब” म्हणून विधवांच्या नावे ऑटोरिक्षा परवाना वितरीत करण्याकरीता “हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना” ही परिवहन विभागाव्दारे दिनांक २१ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आलेली आहे. उक्त योजनेंतर्गत अनुज्ञेय महिला उमेदवाराने मागणी न केल्यामुळे उक्त योजनेंतर्गत परवाना जारी करण्यात आलेला नाही. तथापि, सदर योजनेखाली राज्यात एकूण १०६१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ७४१ जणांना इरादापत्र व ३८२ ऑटोरिक्षा परवाने देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कॉलेज ऑफ इंजिनिअरींग गॅझेटेड टिचर्स असोसिएशनच्या मागण्यांबाबत

**(१८) * ९५५ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४०१८ ला दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गॅझेटेड टिचर्स असोसिएशन यांनी करिअर ॲडव्हान्स स्कीम आणि अन्य मागण्यांबाबत शासनाला निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर असोसिएशनच्या मागण्या व प्रश्न काय आहेत, त्यावर शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित संस्थांमधील २०० शिक्षकांना निवृत्तीपूर्वी पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय.
(२) व (३) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गॅझेटेड टिचर्स असोसिएशन यांच्या निवेदनात पुढील मुद्दे समाविष्ट आहेत.

(अ) सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापकांना मागील ८ ते ९ वर्षापासून करीअर ॲडव्हान्समेंट योजनेचे लाभ प्रलंबित असणे.

(ब) शासन निर्णय, दिनांक ११/९/२०१९ मधील तरतुदीनुसार दिनांक १७/१०/२०१५ ते दिनांक १०/९/२०१९ या कालावधीत अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापकांना ६ व्या वेतन आयोगानुसार करीअर ॲडव्हान्समेंट योजनेचे (कॅस) लाभ प्रदान करणे.

असोसिएशनच्या प्रस्तुत मागण्यांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, शासन निर्णय, दिनांक १७/१०/२०१५ अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शिफारस केल्यानुसार ६ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने करीअर ॲडव्हान्समेंट योजना (कॅस) लागू केलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापकांना कॅस अंतर्गत दिनांक ०१/०१/२००६ ते १६/१०/२०१५ या कालावधीत ७९७ वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणी, ९८ सहाय्यक प्राध्यापक व ६२ प्राध्यापक पदावर पदोन्नतीचे लाभ देण्याची कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयाने केलेली आहे.

दिनांक ११/९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अध्यापकांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू केलेली आहे. सदरच्या शासन निर्णयानुसार कॅस योजनेंतर्गत लाभ प्रदान करणेबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी प्रस्ताव मागविलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षक निदेशकांची विनाअनुदान काळातील सेवा ग्राहय धरण्याबाबत

**(१९) * २३६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६८५ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणे कौशल्य विकास विभागातील एमसीव्हीसीच्या शिक्षक निदेशकांची विनाअनुदान काळातील सेवाग्राहय धरण्याबाबत तसेच त्यांच्या धरणे व तासिका तत्वावरील मानधनात वाढ करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) व (२) बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परिवहन महामंडळाच्या स्थानकांमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याबाबत

**(२०) * ६१२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.महादेव जानकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.निलय नाईक, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सुजितसिंह ठाकूर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बस स्थानकातील परिसर व बस गाड्या स्वच्छतेसाठी ब्रिस्क या खाजगी कंपनीला तीन वर्षासाठी रुपये ४५० कोटीचे कंत्राट दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अनेक महिन्यांपासून सदर कंपनीची यंत्रे बंद असल्याने परिवहन मंडळाच्या मालकीच्या यंत्रांनी आगारातील बसेसची स्वच्छता केली जाते तसेच अनेक महिन्यांपासून परिवहन महामंडळाच्या मुख्यालयातील बस स्थानकामध्ये अस्वच्छता पसरली असून तीन पाळ्यांमध्ये बस स्वच्छतेचे काम सुरु ठेवणे अपेक्षित असताना सकाळी व दुपारी केवळ एक कर्मचारी तर रात्रीच्या वेळी एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने रात्रीच्या वेळी आलेल्या गाड्यांची स्वच्छता होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार नेमलेले असतानाही मुंबई विभागातील परिवहन मंडळाच्या सर्व स्थानकात बसगाड्या धुण्याच्या केंद्रांवर आधुनिक यंत्रसामग्री आणि खाजगी कंपनीचे कर्मचारी नसल्यामुळे काम प्रलंबित राहिल्याने एसटी स्थानके-आगारांचा परिसर, बसगाड्या आणि कार्यालयाची स्वच्छता होत नसल्याने सर्वत्र कचरा पसरल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोट्यवधी रुपयांचा खर्च केलेला असताना ठेकेदार कंपनीकडून कामात अनियमितता झाल्याने काम प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित खाजगी कंपनीच्या कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बसस्थानके, कार्यालये, कर्मचारी विश्रांतीगृह, प्रसाधनगृहे व बसेसच्या स्वच्छतेसाठी राज्यस्तरावर एकात्मिक सुविधा व्यवस्थापन सेवा पुरविण्यासाठी निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करून मे.ब्रिस्क इंडिया प्रा.लि. यांची सेवापुरवठादार म्हणून तीन वर्षासाठी रुपये ४४६.९९ कोटी रकमेवर नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) व (३) सेवापुरवठादार कंपनीने माहे ऑक्टोबर, २०१९ पासून महामंडळाच्या मुंबई विभागात वाहनांच्या स्वच्छतेचे काम बंद केले असून, सदरचे काम आगारांमधील उपलब्ध असलेल्या महामंडळाचे कर्मचारी किंवा बाहेरील खाजगी मजदूर लावून करण्यात येत आहे व महामंडळाच्या मुख्यालयातील मुंबई सेंट्रल बसस्थानकातील सेवा पुरवठादारांची बसगाड्या स्वच्छ करण्याची यंत्रे बंद असून, बसस्थानकात सेवापुरवठादार संस्थेचे कर्मचारी बसगाड्या धुण्यासाठी येत नसल्यामुळे आगारातील उपलब्ध यंत्र सामग्री व कर्मचाऱ्यांकडून बसगाड्यांच्या स्वच्छतेची कामे करुन घेण्यात आली आहेत.

(४) करारातील तरतुदींनुसार सदर कंपनीवर महामंडळाव्दारे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार परिसरात पाणीपुरवठा योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२१) * १८५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार परिसरातील सुमारे ६९ गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या पाणीपुरवठा योजनेतून जे.पी.नगर कोफराडसाठी १,७०,००० लिटर्स क्षमतेचे जलकुंभ बांधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार तालुक्यातील ६९ गावांमध्ये मंजूर झालेल्या योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेची कामे सुरु नसल्याचे 'समर्थन' संस्थेने लेखी पत्राव्दारे मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे योजनेची कामे पूर्ण करण्याची वेळोवेळी मागणी करुनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) वसई-विरार व ६९ गावे उपप्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून योजना कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, या ठिकाणी टाकण्यात आलेल्या वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्या या ७ ते ८ वर्षापूर्वी टाकण्यात आल्या आहेत. यामध्ये दरम्यानच्या कालावधीत झालेल्या रस्ते रुंदीकरण, गटारे बांधणे, क्रॉस ड्रेनेज, स्थानिक विकास कामे इत्यादी कामामुळे सदर योजनेची वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्यांची अनेक ठिकाणी तुटफुट व नासधूस वारंवार झाल्याने त्या दुरुस्त करुन व वसई-विरार महानगरपालिकेकडून उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्याप्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अंशकालीन निदेशकांना वेतन अदा करण्याबाबत

**(२२) * ९७३ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अंशकालीन निदेशकांना माहे एप्रिल, २०१८ पासून वेतन अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास शिक्षणाला अनन्य साधारण महत्व देण्यात आले असून सदर निदेशकांचे वेतन थांबविण्याचे कारण काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त निदेशकांचे वेतन शासन किती दिवसात अदा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील तासिका तत्वावरील काही निदेशकांची मानधनाची देयके अदा करण्यासाठी सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांचे मानधनाबाबत पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत

**(२३) * ६९८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यंत्रणा व अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे तसेच अकार्यक्षम कारभारामुळे सर्वसामान्यांच्या दळणवळणाचा आधार असणाऱ्या परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती मंदावल्याचे सन २०१८-२०१९ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध प्रवासी वाहतूक थांबवणे, घटलेली प्रवासी संख्या वाढविणे, उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करणे, प्रवाश्यांनी केलेल्या तक्रारींची दखल घेणे तसेच इतर सर्व प्रकरणी जिल्हास्तरीय विभाग नियंत्रक यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत तसेच प्रवाश्यांना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही. तथापि, सन २०१८-२०१९ मध्ये सन २०१७-२०१८ च्या तुलनेत एकूण ३ कोटी ६७ लाख इतक्या प्रवासी संख्येत घट झालेली असून, परिणामी महामंडळाच्या उत्पन्नात घट झालेली आहे.
(२) राज्य परिवहन महामंडळाव्दारे याबाबतची जबाबदारी महामंडळाच्या विभागीयस्तरावर निश्चित करण्यात आलेली आहे.
(३) राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी संख्येत वाढ व्हावी यासाठी अत्याधुनिक शयनआसनी व तीर्थक्षेत्रास जाणाऱ्या भाविकांसाठी विठाई या बसेस नव्याने चालनात आणण्यात आलेल्या आहेत. तसेच, उत्पन्नात वाढ होण्याच्या अनुषंगाने कमी अंतराच्या व सातत्याने प्रवासी गर्दी असलेल्या मार्गावर शटल, विनावाहक सेवांच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. प्रवाशी गर्दीचे केंद्र असलेल्या ठिकाणी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती वेळोवेळी आवश्यकतेनुसार करण्यात येत असून, महामंडळाव्दारे बस फेऱ्यांचे सुसुत्रिकरण करण्यात येत असून, स्पर्धात्मक प्रवासभाडे रहावे या हेतूने शिवनेरी, शिवशाही शयनयान या सेवांच्या प्रवासभाड्यामध्ये कपात करण्यात आली आहे.

अवैध प्रवासी वाहतुकीस प्रतिबंध करणेबाबत शासनाने दिनांक १४/०१/२०१६ च्या परिपत्रकान्वये संबधितांना सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षण विभागांतर्गत शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) * ३०० श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागांतर्गत शिक्षणाधिकारी यांची ३९३ पदे रिक्त असून चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत गटशिक्षणाधिकारी यांची १५ पदे रिक्त असल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) राज्यात शिक्षणाधिकारी यांची १४४ पदे मंजूर असून यापैकी ४४ पदे रिक्त आहेत. तर चंद्रपूर जिल्ह्यात गटशिक्षणाधिकारी यांची १४ पदे मंजूर असून १३ पदे रिक्त आहेत.

(२) रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ मंजूर करण्याबाबत

**(२५) * १२८६ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४२००५ ला दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सर्व महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी जोडलेली असल्याने कोकणातील १०३ महाविद्यालयातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातील कामासाठी वारंवार प्रवासाची दगदग, पैशाचा अपव्यय करुन मुंबईला यावे लागत असल्याने विद्यार्थ्यांना अनेक सोयी सुविधापासून वंचित रहावे लागत असून मुंबई विद्यापीठावर येणारा प्रशासकीय भार कमी करण्यासाठी कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग व दक्षिण रायगड भागातील महाविद्यालयांकरीता स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, विद्यार्थी आणि पालक शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणाला स्वतंत्र विद्यापीठाच्या स्थापनेकरीता सचिव पातळीवर एका समितीची स्थापना मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली असून सदर समिती किती कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करणार आहे,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाची सध्या ८२६ महाविद्यालये संलग्न असल्याने प्रशासनावर मोठा ताण पडत असून स्थानिक गरजेप्रमाणे रोजगारक्षम, अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात शिकवले जात नसल्याने कोकणातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील १०३ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्यादृष्टीने स्थानिक गरजेनुसार येथील साधनसामुग्रीवर आधारीत समुद्र विज्ञान, नारळ संशोधन विज्ञान, फळप्रक्रिया विज्ञान, पर्यटन, मेरीटाईम व रेल्वे तंत्रज्ञान संबंधी रोजगारक्षम अभ्यास सुरु करुन स्वतंत्र कोकण विद्यापीठास विनाविलंब मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) रत्नागिरी येथे मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र कार्यरत असून त्याच्या बळकटीकरणाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिडको औद्योगिक वसाहत (जि.पालघर) येथील पानेरी नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत

**(२६) * १४०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिडको औद्योगिक वसाहत (जि.पालघर) येथे काही कारखान्यांमधून रासायनिक प्रदूषित पाणी पानेरी नदीत सोडल्याने आदिवासी व मच्छीमार समाज, बागायतदार शेतकऱ्यांची जीवनवाहिनी असलेली नदी प्रदूषित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर नगरपरिषदेंतर्गत असलेल्या गाव-वाड्यांतील सांडपाणी पानेरी नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास आले असून पालघर नगरपरिषदेकडून सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी नदीत सोडण्यासाठी प्रक्रिया केंद्र उभारणीच्या जमीन संपादनाचे काम मागील ४ वर्षापासून संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करुन २० वर्षापासून पानेरी नदीत होणारे प्रदूषण कमी करुन नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे अंशत: खरे असून पालघर नगरपरिषदेच्या हद्दीतून निघणाऱ्या अप्रक्रियाकृत सांडपाण्यामुळे पानेरी ओहोळ प्रदूषित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) पानेरी नाल्यातील सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद, पालघर यांनी NEERI या संस्थेकडून बनवून घेतला आहे. सदर प्रकल्पाकरीता वाटाघाटीने भूसंपादनाची कार्यवाही पालघर नगरपरिषद, पालघर यांच्या कार्यालयामार्फत सुरु आहे.

(३) पालघर नगरपरिषदेच्या हद्दीतून निघणाऱ्या अप्रक्रियाकृत सांडपाणी पानेरी ओहोळामध्ये मिसळत असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पालघर नगरपरिषदेविरुध्द फौजदारी खटला क्र. १३६/२०१६ दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मुळा-मुठा नद्या प्रदूषित झाल्याबाबत

**(२७) * १६७७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मुळा-मुठा नद्यांमध्ये प्रतिदिन ७५० दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया न करता सोडल्याने दोन्ही नद्या प्रदूषित झाल्या असून त्याचा परिणाम पुण्यातील नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुळा-मुठा नद्या प्रदूषण मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेतर्फे प्रतिदिन ५५० दशलक्ष लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. पुणे महानगरपालिकेतर्फे उर्वरित सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता आराखडा तयार केला असून ३९४ एम.एल.डी. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया यंत्र उभारणे जायकाच्या सहकार्याने प्रस्तावित असून सदर कामे सन २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनचालकांची नेत्र तपासणी करण्याबाबत

**(२८) * २०६६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वाहतूक पोलिसांनी दिनांक ११ जानेवारी ते १७ जानेवारी, २०२० या कालावधीत नेत्र तपासणी मोहिमेत मुंबईतील ४० हजार चालकांची तपासणी केली असता त्यामध्ये १० हजारांपेक्षा अधिक म्हणजेच २५ टक्के

वाहनचालकांची दृष्टी कमजोर असून ३५०० चालकांपैकी १६०० चालकांची दृष्टी वाहन चालविण्यास योग्य नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेत टॅक्सीचालक, रिक्षाचालक, खाजगी वाहनचालक व इतर वाहन चालकांचा समावेश असून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर वाहनचालक परवाना काढल्यानंतर वाहन चालविण्यासाठी चालकांची दृष्टी चांगली आहे का याबाबत शासकीय यंत्रणा कोणतीही तपासणी करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमजोर दृष्टीमुळे अपघात होत असल्याने वाहनचालकाचा परवाना नुतनीकरण किंवा ठराविक कालावधीनंतर नेत्र तपासणी बंधनकारक करण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय, तसेच, सदरहू नेत्र तपासणी बंधनकारक न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील इतर जिल्ह्यातही वाहनचालकांची नेत्र तपासणी मोहिम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

मुंबई वाहतूक पोलीस विभागाकडून प्राप्त माहितीनुसार दिनांक ११/०१/२०२० ते दिनांक १७/०१/२०२० या कालावधीत रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या कालावधीत वाहतूक पोलीस विभागाकडून राबविण्यात आलेल्या नेत्र तपासणी मोहिमेत ३७०८४ नागरीकांची नेत्र तपासणी केली असता १०,५७३ नागरिकांच्या नेत्रात दोष असल्याचे आढळून आलेले आहे.

(२), (३) व (४) मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८ च्या पोटकलम (३) नुसार परिवहन वाहनाच्या चालकास शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्यापूर्वी विहित प्रपत्रात वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून त्यामध्ये चालकाची दृष्टी तपासण्याची बाब अंतर्भूत आहे. तसेच वाहनचालकाच्या अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करताना मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम

१५ पोटकलम (१) नुसार विहित नमुन्यात वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून नेत्र तपासणीच्या पुर्ततेशिवाय अनुज्ञप्ती नुतनीकरणाकरीता अर्ज स्वीकारण्यात येत नाही.

दिनांक ११ जानेवारी, २०२० ते दिनांक १७ जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात ३१ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२० साजरा करण्यात आला. सदर रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनाकरीता राबवावयाच्या उपक्रमांबाबत शासनाने दिनांक ०६/०१/२०२० च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व संबंधितांना विविध संस्थांच्या सहकार्याने वाहन चालकांकरीता नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथे तिवरांच्या झाडांचे संरक्षण करण्याबाबत

**(२९) * २०८० श्री.महादेव जानकर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील नेरुळ, खारघर, सीवूड, कामोठे, पनवेल येथे तिवरांच्या झाडांची कत्तल करुन बांधकाम उभारण्याची कामे मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी तिवरांच्या झाडांची संख्या कमी होत असल्याने नवी मुंबई महानगरपालिका व सिडको प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या परवानगीबाबत माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.उच्च न्यायालयाने पाठविलेल्या नोटीसामध्ये महानगरपालिकेला कांदळवनाचे संरक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण संरक्षणासाठी कांदळवन महत्त्वाचे असल्याने महानगरपालिकेने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) दिनांक ०७/०१/२०२० रोजी हिंदुस्तान टाईम्स या इंग्रजी दैनिक वर्तमान पत्रामध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कांदळवन तोडीच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या Save Mangrove and Navi Mumbai Existence या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने बातमी छापून आलेली होती.

(२) मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०१/२०२० रोजी जनहित याचिका क्र.९८/२०१३ व ९८/२०१४ मध्ये दिलेल्या निर्णयामध्ये संबंधित याचिकाकर्त्याला त्यांनी केलेल्या आरोपा संदर्भात सविस्तर पुरावे आदेशापासून ४ आठवड्याच्या आत प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) नवी मुंबई महापालिकेमार्फत कांदळवन संरक्षणासाठी सूचना फलक लावणे, चेनलिंग फेसिंग करणे, कांदळवन क्षेत्रात डेब्रिज टाकून भराव करणेस प्रतिबंध करणेसाठी २ वार्ड मिळून १ याप्रमाणे ४ डेब्रिज भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच तिवराच्या कत्तलीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास कार्यवाही करण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन संधारण घटक, नवी मुंबई यांना सुचित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेबाबत

**(३०) * २२१३ श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी घेतलेल्या मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) अभ्यासक्रमाच्या पहिल्या सेमिस्टरमधील स्टॅटेस्टिक ॲण्ड प्रोबॅबिलिटी विषयाच्या परीक्षेत माहे मे, २०१८ ची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नपत्रिकेत ८० पैकी ७० गुणांचे प्रश्न सारखेच असल्याने या प्रकरणी प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्या दोन प्राध्यापकांना सेवेतून बडतर्फ करण्याची सूचना विद्यापीठाने दिली असून पेपर सेटींग कमिटीच्या अध्यक्षाची शिक्षक म्हणून तीन वर्षे मान्यता रद्द करण्याचा निर्णय मुंबई विद्यापीठाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मुंबई विद्यापीठाने दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी घेतलेल्या मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) अभ्यासक्रमाच्या पहिल्या सेमिस्टरमधील स्टॅटेस्टिक ॲण्ड प्रोबॅबिलिटी विषयाच्या प्रश्नपत्रिकेबाबत परीक्षा विभागाने अवैध साधन चौकशी समितीमार्फत सदर प्रश्नपत्रिका सेट करणाऱ्या दोन प्राध्यापकांना सेवेतुन बडतर्फ करण्याची व पेपर सेटिंग कमिटीच्या अध्यक्षांची शिक्षक म्हणून तीन वर्षे मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील पूरक नळ योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * २३८० ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील पूरक नळ योजनेचे काम शासनाने निधी उपलब्ध करूनही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पूरक नळ योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील नळ योजना नुतनीकरण करणे या अंतर्गत योजनेचे काम समितीमार्फत करताना मुळ अंदाजपत्रकामधील टाकीच्या नियोजित जागेमध्ये बदल झाल्याने तांत्रिक बदल करण्यात आला. त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार योजना पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तथापि, सदर योजनेतून बायपासव्दारे जुन्या योजनेतील वितरण व्यवस्थेतील जलवाहिनीव्दारे चाचणी स्वरुपात पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा घेणाऱ्या कंत्राटदार कंपनीवर कारवाई करणेबाबत

**(३२) * २३९७ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत माहे जानेवारी, २०२० मध्ये महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षेचे आयोजन करण्यात आलेल्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत शुध्दलेखनाच्या ११० हून अधिक चुका असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू परीक्षा घेणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीकडून सन २०१७ मध्ये आयोजित केलेल्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र वाटपामध्ये तांत्रिक चुका आढळून आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंत्राटदार कंपनीसोबतचा करार संपुष्टात आणावा अशी मागणी श्री.शकील पाटणी, सामाजिक कार्यकर्ता यांनी पत्राद्वारे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री, तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संपूर्ण राज्यभरात घेण्यात येणाऱ्या परिक्षेत वारंवार चुका करणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीसोबतचा करार संपुष्टात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे, सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत करण्यात येण्याचे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील पेट्रोल पंपावर ग्राहकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * २५९९ श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पेट्रोल पंपावर वाहनात हवा भरण्याची नि:शुल्क व्यवस्था, प्रथमोपचार पेटी, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, शुध्द पाण्याची व्यवस्था, आपत्कालीन परिस्थितीत ग्राहकांसाठी दूरध्वनीची सोय संबंधित पेट्रोल पंपचालकांनी करावी असे शासनाने निर्बंध घातले असून नांदेड शहरासह जिल्हयातील अनेक पेट्रोल पंपचालक शासनाच्या नियमांचे उल्लंघन करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयात व आसपासच्या परिसरातील पेट्रोल पंपचालक शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन आवश्यक सोयी सुविधा पेट्रोल पंपावर उपलब्ध करीत नसल्याने वाहनचालकांची गैरसोय होत असून संबंधित विभागाचे अधिकारी दोषी पेट्रोल पंपचालकासोबत संगनमत करुन या बाबींकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदेड शहरासह जिल्हयातील अनेक पेट्रोल पंपावर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) नांदेड जिल्हयामध्ये हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचे ३८ पेट्रोल पंप असून त्यापैकी ३३ पेट्रोल पंपावर सर्व सुविधा पुरविण्यात येत आहेत. तर उर्वरित ५ पेट्रोल पंपापैकी १ पेट्रोल पंपाचे बांधकाम सुरु आहे व उर्वरित चार पेट्रोल पंपावर हवा भरण्याची नि:शुल्क व्यवस्था नसल्यामुळे कंपनीने त्याबाबत संबंधितांना आदेश दिले आहेत.

भारत पेट्रोलियम कंपनीचे ३६ पेट्रोल पंप असून एक पेट्रोल पंप वगळता सर्व पेट्रोल पंपावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध आहेत. एका पेट्रोल पंपावर जागेअभावी स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्यामुळे सदर पेट्रोल पंपचालकास कंपनीच्या नियमानुसार दंड आकारण्यात आलेला आहे.

इंडियन ऑईल कंपनीचे ४६ पेट्रोल पंप असून ३६ पेट्रोल पंपावर आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. १० पेट्रोल पंपावर स्वच्छतागृहाचे बांधकाम सुरु आहे.

तसेच इस्सार/नयारा एनर्जी लिमिटेडचे १२ पेट्रोल पंप असून त्याठिकाणी नि:शुल्क हवा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. रिलायन्स कंपनीचा एक पेट्रोलपंप असून तेथे आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) तेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून पेट्रोल पंपाच्या नियमित तपासण्या करण्यात येत असून दोषी पेट्रोल पंपधारकांविरुध्द तेल कंपन्यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३४) * २२९७ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित महाविद्यालयामधील प्राध्यापकांनी अर्हता व पात्रता पूर्ण केल्यानंतर त्यांना सहयोगी प्राध्यापक पदासाठी सेवांतर्गत प्रगती योजनेचा (कॅस) लाभ देण्यात विभागीय सहसंचालकांकडून जाणीवपूर्वक अडवणूक करण्यात येत असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार प्राध्यापकांना अर्हता व पात्रता पूर्ण केल्याच्या तारखेपासून सेवांतर्गत प्रगती योजनेचा (कॅस) लाभ देणे बंधनकारक असतानाही सहसंचालकांकडून त्यांना मुलाखतीच्या दिवसापासून लाभ देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन यूजीसीच्या नियमाप्रमाणे सेवांतर्गत प्रगती योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १८/०७/२०१८ च्या अधिसूचनेनुसार शासनाच्या दिनांक ०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये शासनाच्या दिनांक १०/०५/२०१९ च्या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करून सेवांतर्गत प्रगती योजना लागू करण्याबाबतची तरतूद आहे. त्यानुसार मुलाखतीच्या दिनांकापासून सेवांतर्गत प्रगती योजनेचे लाभ देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडून निधीची पूर्तता करण्याबाबत

**(३५) * ५१६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडून वेळेत निधीची पूर्तता न केल्यामुळे पी.एच.डी.च्या संशोधकाचे शोधप्रबंध विद्यापीठाच्या आवक-जावक विभागाकडे मागील ४ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय देयक प्रतिपुर्तीसाठी जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्रतिस्वाक्षरीची अट रद्द करण्याबाबत

**(३६) * १०१४ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक कर्मचारी यांनी पाच गंभीर आजारांवर शासनमान्य दवाखान्यात उपचार घेतल्यास वैद्यकीय देयक प्रतिपुर्तीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक असल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनमान्य रुग्णालयात उपचार घेतल्यास अशाप्रकारे अटी व शर्ती लावणे अनावश्यक असून सदर अट रद्द करण्यात यावी, अशी मागणी विविध संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) होय, अंशत: खरे आहे. महाराष्ट्र वैद्यकीय देखभाल अधिनियम, १९६१ च्या नियम ८ मधील तरतूदी आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ३०/०७/१९८७, दिनांक २५/०२/१९९९ नुसार शासकीय तसेच शासनमान्य खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी जिल्हा वैद्यकीय अधीक्षक (जिल्हा शल्य चिकित्सक) यांच्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच वैद्यकीय प्रतिपूर्तीकरीता जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खाजगी आय.टी.आय. शाळांना अनुदान देणेबाबत

**(३७) * १६५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येत असलेल्या आय.टी.आय. शाळांना अनुदान देणेबाबत शासनाकडून समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी आय.टी.आय. शाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) शासनाने खाजगी औदयागिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान न देता त्यामधील प्रवेशित प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासन निर्णय, दिनांक २९ मे, २०१९ अन्वये शासनाने घेतला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत ४० टक्के हिस्सा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) * २०४ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७९३ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा २.०) अंतर्गत विद्यापीठ व महाविद्यालयाच्या विविध योजनेसाठी सन २०१९-२०२० या वर्षाकरीता मान्यता दिल्या असून सदर योजनेत ६० टक्के हिस्सा केंद्र शासनाचा तर ४० टक्के हिस्सा राज्य शासनाचा असून सदर निधी संस्थेच्या भौतिक सोयी सुविधेकरीता वापरला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५ संस्थांना शासनाने दिनांक १९ जुलै, २०१९ च्या आदेशान्वये ४० टक्के हिस्स्यासह निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर शासनाने शासनाचा ४० टक्के हिस्सा महाविद्यालयांनी स्वनिधीतुन करावा अशा हमीपत्राची संस्थांकडून मागणी केली, परंतु राज्यातील महाविद्यालये आर्थिक क्षमतेअभावी शासनाचा ४० टक्के हिस्सा खर्च करु शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाचा ४० टक्के हिस्सा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक १९ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये १४ संस्थांना राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत घटक क्र.९ महाविद्यालयांसाठी भौतिक सुविधा (Infrastructure Grants to Colleges) या अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला ६० टक्के निधी राज्य शासनाच्या ४० टक्के हिस्स्यासह उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यास अनुसरुन दिनांक ०९ ऑगस्ट, २०१९ च्या मंजूरी आदेशान्वये रुसा संचालनालयाने सदर निधी संबंधित महाविद्यालयांना वितरीत केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील घोषित, अघोषित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांना अनुदान मंजूर करण्याबाबत

**(३९) * ७२४ श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अघोषित प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच घोषित उच्च माध्यमिक शाळा व तुकड्या तसेच अघोषित, घोषित कनिष्ठ महाविद्यालयातील विनाअनुदानित शिक्षकांना प्रचलित नियमानुसार टप्प्याटप्प्याने पाच वर्षात अनुदान देण्याबाबत शासनाने

सभागृहात घोषित केले असून अनुदान मंजुरीसाठी आवश्यक तरतुदींची पुरवणी मागणी मंजूर करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.वित्तमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये ३०४ कोटी इतक्या खर्चाची तरतूद करण्यात येईल असे दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी (बैठक क्र.२३५) मध्ये झालेल्या बैठकीत म्हटले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अनेक शाळांना अनुदानच मिळाले नाही तर काही शाळा व कनिष्ठ महाविद्यालये अघोषित राहिल्यामुळे विनाअनुदानित शाळांना अनुदान घोषित करण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र टिचर्स असोसिएशनने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागण्यांसाठी दिनांक २३ जानेवारी, २०२० पासून मुंबईच्या आझाद मैदान येथे महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृती समिती व अन्य शिक्षक संघटनांच्यावतीने उपोषण करण्यात येवून त्याबाबतचे निवेदन मा.शालेय शिक्षण मंत्री यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शाळा व तुकड्या व अतिरिक्त शाखांवरील शिक्षक शिक्षकेतर पदांना सातव्या वेतन आयोगानुसार शासन मान्यता देऊन निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अनुदान वाटपाबाबत घोषित करुनही सदरचे अनुदान वाटप न करण्याची कारणे काय आहेत, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) होय.

(३) व (४) होय, खरे आहे.

(५) सदर बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत नागपूर शहरातील विविध केंद्रावरील विद्यार्थी पुस्तकांपासून वंचित असल्याबाबत

**(४०) * ३५८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत नागपूर शहरातील विविध केंद्रावरील विद्यार्थी परीक्षा कालावधीत पुस्तकांपासून वंचित राहिल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रवेश घेतांना विद्यापीठामार्फत पुस्तके देण्यात येतील तसेच अभ्यासक्रमाचे अभ्यास साहित्य ऑनलाईन उपलब्ध करण्याचे आश्वासन संबंधित विभागाने दिले असून पुस्तके व अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना साधारणत: सेमिस्टर पॅटर्नची पुस्तके दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ पर्यंत पोहोचणे अपेक्षित होते. परंतु काही अभ्यासकेंद्रांना पुस्तके सुमारे १०-२० दिवस उशिरा पोहोचली. मात्र संबंधित अभ्यासकेंद्रांनी त्यांच्या मागील शिल्लक साठ्यातून पुस्तकांचे वितरण केलेले असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.

(२) हे खरे नाही. सर्वसाधारणपणे अभ्यासकेंद्र विद्यार्थ्यांना आपल्या शिल्लक साठ्यातूनच प्रवेशाच्यावेळी पुस्तके देतात व उर्वरित पुस्तकांची विद्यापीठाकडे मागणी करतात. ज्या अभ्यासकेंद्रांनी मागणी केलेली नाही अशा अभ्यासकेंद्राना त्यांच्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुस्तके वितरीत केली जातात. नागपूर शहरातील अभ्यासकेंद्राना परीक्षेपूर्वीच विद्यापीठाच्या

नागपूर विभागीय केंद्रामार्फत पुस्तकाचे वितरण करण्यात आले आहे. नागपूर शहरातील कोणत्याही अभ्यासक्रेंद्रास ऑनलाईन पुस्तके उपलब्ध करुन मिळतील असे आश्वासन नागपूर विभागीय केंद्रामार्फत देण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळयाहून कळवणकडे जाणाऱ्या बसचा अपघात झाल्याबाबत

**(४१) * २२३७ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळयाहून कळवणकडे जाणाऱ्या उमराणे-देवळा बसचे समोरील टायर फुटल्याने बस चालकाचे नियंत्रण सुटून बसची नाशिक जिल्ह्यातील देवळा-मालेगांव रस्त्यांवरील मेथील फाटयानजीक (ता.देवळा, जि.नाशिक) रिक्षाला धडक लागून रिक्षा आणि बस साठ फूट खोल विहिरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात २६ जण ठार व ३१ जण गंभीररीत्या जखमी झाल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना तसेच जखमींना शासनाने किती आर्थिक सहाय्य दिले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना तसेच जखमींना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे आहे.

परंतू, सदरचा अपघात राज्य परिवहन बसचे टायर फुटल्याने झालेला नाही.

(२) व (३) सदर अपघातातील अपघातग्रस्त व त्यांचे वारसांना राज्य परिवहन महामंडळाकडून एकूण रुपये १,९७,५००/- एवढी तत्कालीक आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच, त्यांचेकडून अपघात नुकसान भरपाई मागणीचे 'पी' फॉर्म भरुन घेऊन दिनांक २८/०२/२०२० अखेर राज्य परिवहन बसमधील १५ मृत प्रवाशांचे वारसांना प्रत्येकी रुपये १०.०० लाख प्रमाणे एकूण रुपये १ कोटी ५० लाख अंतिम नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच, मृतांपैकी राज्य परिवहन चालकाचे वारसास श्रमिक नुकसान भरपाई कायद्यांतर्गत रुपये ५,१३,३२०/- रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच, मृतांपैकी ०१ मृताचे वारस मा.न्यायालयात जाणार असल्याने त्यांनी नुकसान भरपाई स्वीकारण्यास नकार दिला आहे.

अॅपे रिक्षातील ९ मृतांपैकी ६ मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये २.०० लाखप्रमाणे एकूण रुपये १२.०० लाख इतकी रक्कम राज्य परिवहन महामंडळाव्दारे अदा करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित ३ मृत व्यक्तींचे वारसांची महामंडळाच्या पथकाव्दारे प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना वारस कागदपत्रे सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्याचबरोबर गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनेंतर्गत या अपघातातील अॅपे रिक्षामधील मृत ४ व्यक्ती पात्र होत असून, सदर विमा योजनेंतर्गत त्यांच्या वारसांना प्रत्येकी रुपये २.०० लाख रक्कम मिळणेबाबतची कार्यवाही कृषी विभागाव्दारे करण्यात येत आहे.

तसेच, राज्य परिवहन बसमधील ३४ जखमींना अंतिम नुकसान भरपाई अदा करण्याकरीता महामंडळाद्वारे स्वंतत्र पथके तयार करण्यात आली आहेत.

सदर अपघाताची चौकशी पोलीस विभाग व राज्य परिवहन महामंडळाकडून करण्यात आली असून या दोन्ही प्राथमिक चौकशीत सदर अपघातास राज्य परिवहन चालक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

राज्य परिवहन बस चालकाविरुध्द मृत्यूपश्चात देवळा पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम ३०४, २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर-शेणवा (ता.शहापूर, जि.ठाणे) मार्गावर दुर्गंधीयुक्त रसायने सोडल्याबाबत

**(४२) * १३५१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर-शेणवा (ता.शहापूर, जि.ठाणे) मार्गावरील शेलवली व सापगाव नजीकच्या परिसरात रात्री अंधारात केमिकलयुक्त रसायने सोडल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रसायनामुळे परिसरात दुर्गंधी पसरुन नागरिकांना उग्रवासाचा तसेच श्वसनाचा त्रास होवू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले याबाबत ग्रामस्थांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बेकायदेशीररीत्या दुर्गंधीयुक्त रसायने मोकळ्या जागेत सोडल्याने नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून जमिनीची पोत नष्ट होण्याची भिती निर्माण झाल्याने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन विषयाबाबतचे ग्रामस्थांचे निवेदन तहसिलदार, शहापूर यांचेकडून प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचेकडे प्राप्त झाले होते.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०३/०२/२०२० रोजी केलेल्या पाहणीदरम्यान मौजे शेलवली व मौजे मळेगाव येथे रस्त्यालगत रासायनिक सांडपाणी सोडल्याच्या खुणा आढळून आल्या होत्या. तथापि, पाहणीवेळी तपासणीकरीता प्रत्यक्षात रासायनिक सांडपाणी न आढळल्याने सदर सांडपाणी सोडणाऱ्या संबंधित दोषी उद्योगावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कारवाई करणे शक्य झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(४३) * २५९३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८५१ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक औषध विक्रेते प्रिस्क्रिप्शनशिवाय ॲन्टीबायोटिक औषधांची विक्री करीत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर औषध विक्रेत्यांवर कारवाई करुन प्रिस्क्रिप्शनशिवाय होत असलेली औषधांची विक्री रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) अन्न व औषध प्रशासनाने घेतलेल्या तपासणी मोहिमेत राज्यातील काही औषध विक्रेते विक्रीसाठी प्रिस्क्रिप्शन आवश्यक असलेल्या औषधांची / ॲन्टीबायोटिक्सची विक्री विना प्रिस्क्रिप्शन करत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाव्दारे राज्यात विना प्रिस्क्रिप्शन अनुसूचित औषधांच्या विक्रीबाबत विशेष मोहिम व नियमित तपासणी दरम्यान माहे मार्च, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत एकूण ७८५८ औषध पेढ्यांची तपासणी केली. तपासणी दरम्यान औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याच्या आढळून आलेल्या उल्लंघनाच्या अनुषंगाने ९९५ औषध पेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत तर १३६ औषध पेढ्यांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पर्यटन विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४४) * २३८६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्याच्या पर्यटन विकास कामांसाठी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला असून सदर निधी प्राप्त न झाल्यामुळे अलिबाग तालुक्यातील पर्यटन विकासाची कामे अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील पर्यटन विकासाच्या मंजूर जुन्या कामांसाठी निधी प्राप्त झालेला नसताना नव्याने पर्यटन विकासाच्या नवीन कामांना शासनाकडून निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात अलिबाग तालुक्यातील पर्यटन क्षेत्रातील विकास कामांसाठी मंजूर झालेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे :** (१) अंशत: हे खरे आहे.

सदर कामासाठी शासन निर्णय, दिनांक १८/२/२०१८ अन्वये रायगड जिल्ह्यातील एकूण ६ कामासाठी रुपये १२९८.७६ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रुपये १३५.५० लक्ष निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि, दरम्यानच्या कालावधीत रायगड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता असल्याने दिनांक २०/२/२०१९ चा शासन निर्णयान्वये सदर कामांना स्थगिती देण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर कामांसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार व राज्य पर्यटन विकास समितीच्या मान्यतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरटीओ कार्यालयातील पीयूसी मशीनची तपासणी करण्याबाबत

**(४५) * २१२६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५ प्रादेशिक परिवहन कार्यालयांना करोडो रुपये खर्च करुन सन २००० मध्ये ७० व माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये ५० पीयूसी मशीन देण्यात आल्या असून मागील १८ वर्षापासून पीयूसी मशीनची (कॅलिब्रेशन) तपासणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयात पीयूसी मशीन विनावापर बंद स्थितीत असल्याने प्रदूषण नियंत्रणासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत फिटनेस प्रमाणपत्र देतेवेळी प्रदूषणस्तर माहितीसाठी पीयूसी प्रमाणपत्र देण्यात येते, परंतु, पीयुसी मशीनची तपासणी न होता त्या विनावापर बंद असतानाही मोटर वाहन निरीक्षक वाहनांची तपासणी करुन पीयूसी केंद्रावर देत असलेल्या पीयूसी प्रमाणपत्राला योग्य समजून प्रमाणपत्र देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील पीयूसी मशीनची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, धुळे, अहमदनगर, ठाणे या कार्यालयामध्ये मशीनचे कॅलिब्रेशन झाले आहे. मुंबई (मध्य), पेण, सांगली, बुलढाणा इत्यादी कार्यालयांनी कॅलिब्रेशन करण्यासाठी उत्पादकांच्या कंपनीशी संपर्क साधला/पत्रव्यवहार केला. परंतु कंपनीकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे कॅलिब्रेशन होऊ शकले नाही. काही पीयूसी तपासणी मशीन्स वर्ष २००८ पूर्वीच्या असल्यामुळे त्या अद्ययावत होऊ न शकल्यामुळे तसेच सदर मशीन भारत स्टेज-३, भारत स्टेज-४ मानांकाप्रमाणे परिणाम देऊ शकत नसल्यामुळे,

कालांतराने सदर मशीनचा वापर बंद झाला. तसेच काही परिवहन कार्यालयामध्ये मनुष्यबळ अपुरे असल्यामुळे, काही कार्यालयात मशीन अपग्रेड होऊ न शकल्यामुळे, काही कार्यालयात पीयूसी मशीनचे कॅलिब्रेशन होऊ न शकल्यामुळे, सदर कार्यालयात काही पीयूसी मशीन्स बंद स्थितीत आहेत.

(३) हे खरे नाही.

याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, प्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्राधिकृत केलेल्या पीयूसी तपासणी केंद्राकडून जारी करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जातात. दिनांक ०९/०९/२०१९ पासून पीयूसी केंद्रे चालकांकडून वाहन ४.० प्रणालीवर ऑनलाईन पीयूसी देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे या पीयूसी केंद्राकडून जारी करण्यात येणारी ऑनलाईन पीयूसी प्रमाणपत्रे स्वीकारण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत राज्यात एकूण ३०७० पीयूसी केंद्रे ऑनलाईन प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्रे जारी करत आहेत.

(४) दिनांक ०९/०९/२०१९ पासून विभागाने प्राधिकृत केलेल्या पीयूसी केंद्र चालकांकडून वाहन ४.० प्रणालीवर ऑनलाईन प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे पीयूसी केंद्राकडून मिळणारे ऑनलाईन प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र स्वीकारण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला वेतन अनुदान देण्याबाबत

**(४६) * ९६५ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला शासनाने वेतन अनुदानाचा हिस्सा न दिल्याने मुंबईतील गरीब व गरजू विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या सुमारे २०० अनुदान पात्र शाळांना महानगरपालिकेने अनुदान दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान पात्र शाळा गत अनेक वर्षापासून अनुदानाची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर काम करित असल्यामुळे सदर शाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना या पुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नसल्याचे शासन पत्र दिनांक १३ जानेवारी, २००४ अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे.
(३) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती विनियमन अधिनियम १९७७ मधील नियम ४(३) नुसार विनाअनुदानित शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित खाजगी संस्थेची आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील वरीष्ठ महाविद्यालयामध्ये सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ करणेबाबत

**(४७) * २३७ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयाने सुरु केलेल्या कला पदवी अभ्यासक्रमांतर्गत सामाजिक शास्त्र विषय येत असून या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या चौथ्या पेपरचा कार्यभार अनुदान तत्वावर घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ करण्यास मंजूरी देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) कला पदवी अभ्यासक्रमांतर्गत सामाजिक शास्त्र हा विषय येत असून या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या चौथ्या पेपरचा कार्यभार अनुदान तत्वावर घेण्यात येणार आहे, हे खरे नाही.
(२) समितीचा अहवाल नकारात्मक आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत उभारण्यात येणारे अत्याधुनिक बसतळ (बसपोर्ट) प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४८) * १७६४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रमुख अशा १५ शहरांमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना विमानतळाप्रमाणेच अत्याधुनिक दर्जेदार असे बसतळ उभारण्याचा निर्णय तत्कालीन मा.परिवहन मंत्री यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घोषित केले असून त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदांमधील अटी-शर्ती, प्रकल्पांचे सातत्याने बदलणारे नियोजन अश्या अनेक कारणांमुळे महामंडळ बसतळ उभारण्यास अपयशी ठरत असून बांधा, वापरा, हस्तांतरित करा योजनेंतर्गत बांधले जाणारे बसतळ केवळ तीस वर्षाच्या भाडेपट्टीने देण्याबाबतची अट असल्याने अनेक बांधकाम व्यावसायिक सदर योजनेसाठी पाठिंबा देत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करुन बसतळ प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, सदरहू योजनेसाठी किती निधीची आवश्यकता आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१), (२), (३) व (४) महामंडळाव्दारे बसपोर्टची निर्मिती करण्याकरीता यापुर्वी १३ ठिकाणांची निवड करण्यात आली व नव्याने ठाणे वंदना व भिवंडी (ठाणे) या बसस्थानकांचा देखील समावेश करण्यात आला असून, प्रकल्प अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे. सन २०१७ पासून प्रकल्पांकरीता निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येत असून, सद्य:स्थितीत १५ ठिकाणांपैकी पनवेल व औरंगाबाद येथील विकासकांची निवड करण्यात आलेली आहे.

तथापि, सध्या जमीन मिळकत (रियल इस्टेट) व्यवसायात मंदी असल्याच्याकारणाने सदर प्रस्तावांना विकासकांचा अल्प प्रतिसाद प्राप्त होत आहे.

या प्रकल्पांतर्गत आस्थापनांची अद्ययावत पध्दतीने पुनर्बांधणी करुन सर्व आधुनिक स्वरुपाच्या सुविधा उदा. प्रवाशांसाठी प्रशस्त प्रवेश लॉबी, आधुनिक पध्दतीची आसन व्यवस्था, वातानुकूलित बसच्या प्रवाशांसाठी वातानुकूलित प्रतिक्षालय, पिण्याचे शुध्द पाणी व थंड पाणी, स्वतंत्र वाहनतळ, चालक-वाहक व महिला वाहक विश्रांतीसाठी वातानुकूलित विश्रामगृह, आगमन-निर्गमन व्यवस्था इत्यादी सोयी सुविधांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

सदर प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर करण्यात येत असून, बसस्थानक व व्यापारी संकुल बांधणेचा खर्च विकासकाकडून करण्यात येत असून, प्रकल्पांकरीता स्वतंत्र निधीची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नगर परिषद शिक्षकांना वैयक्तिक प्रतिपूर्ती मिळणेबाबत

**(४९) * ११३४ डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४७६४७ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगर परिषदेमधील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक प्रतिपूर्ती खर्च देण्याविषयी सततची मागणी होत असून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्यावतीने निवेदनाद्वारे प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील नगर परिषदेमधील कार्यरत शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) राज्यातील नगर परिषद क्षेत्रातील प्राथमिक शाळा आणि नगरपरिषद संचलित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अनुदानाच्या सूत्रानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय केली जाते. तसेच नगरपरिषद संचलित १०० टक्के अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २८/११/२०१९ च्या पत्रान्वये सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जय महाकाली शिक्षण संस्था, वर्धा अंतर्गत सिंधी मेघे/नागठाणा परवाना रद्द करण्याबाबत

**(५०) * २५६७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जय महाकाली शिक्षण संस्था, वर्धा अंतर्गत सिंधी मेघे/नागठाणा येथे नर्सरी शाळेपासून ते अभियांत्रिकी महाविद्यालयापर्यंत वेगवेगळे अभ्यासक्रम शिकविले जात असून एकाच इमारतीमध्ये वेगवेगळी महाविद्यालये दाखवून शासनाची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, AICTE/DTE विद्यापीठ यांच्याकडे बनावट कागदपत्र सादर करुन विविध अभ्यासक्रमाची परवानगी तसेच ग्रामपंचायत/नगरपरिषद येथील कर्मचाऱ्यांसोबत संगनमत करुन बनावट सातबारा, बनावट खरेदी खत इ. बनावट कागदपत्रांच्या आधारावर महाविद्यालयाने परवाना मिळविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरप्रकाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार करुनही संबंधित संस्थेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शिक्षण संस्थेचा परवाना रद्द करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) नाही, अशा स्वरुपाची तक्रार उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे अथवा तंत्र शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमांना मान्यता देण्याची बाब अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली अथवा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई या प्राधिकरणांच्या अधिकार कक्षेत येते. सर्वसाधारणपणे याबाबत या प्राधिकरणांकडून आवश्यक ती तपासणी करुन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्यात येते.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवलीतील मीटर नसलेल्या रिक्षाचालकांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(५१) * २२५२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवलीतील २ हजार रिक्षाचालक विनामीटर रिक्षा चालवून प्रवाश्यांकडून मनमानी भाडे आकारत असल्याने प्रवाश्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून उक्त गैरप्रकारास प्रतिबंध घालण्यास आरटीओ विभागास अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मीटर नसेल तर रिक्षा जप्त करण्याचे आदेश परिवहन विभागाने आरटीओंना दिलेले असतानाही आरटीओ अधिकारी रिक्षाचालकांना अर्थपूर्ण संबंधामुळे पाठीशी घालत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार मीटर नसलेल्या किती रिक्षाचालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) हे खरे नाही.

अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे. मात्र, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्याव्दारे करण्यात आलेल्या ऑटोरिक्षा तपासणीमध्ये ऑटोरिक्षांना मीटर नसल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) मोटर वाहन नियमानुसार ऑटोरिक्षाला ईलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे आवश्यक असून रिक्षांना मीटर बसविल्याशिवाय त्याची नोंदणी करण्यात येत नाही.

तसेच नियमानुसार ऑटोरिक्षाची योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करतेवेळी ऑटोरिक्षा मीटरची तपासणी करण्यात येते. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्याव्दारे नियमित तसेच विशेष मोहिमा राबवून ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात येते.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्याव्दारे माहे एप्रिल, २०१९ ते माहे जानेवारी, २०२० या कालावधीत एकूण ७,०६० ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये ९७५ ऑटोरिक्षांवर कारवाई करुन रुपये २१,६६,९००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयात जनजागृतीसाठी पाठविण्यात आलेल्या एलईडी स्क्रीन व्हॅनबाबत

**(५२) * १४३१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील ग्रामीण भागात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत एलईडी स्क्रीन असलेली व्हॅन पाठविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील जनतेमध्ये विविध माध्यमातून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी घनकचऱ्याची व्यवस्था सांगणारे विविध संदेश, कचऱ्याचे वर्गीकरण कसे करावे अशा प्रकारची माहिती स्क्रीनव्दारे दिली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील किती तालुक्यातील गावांना सदर व्हॅनची सुविधा पुरविण्यात आली आहे, तसेच पालघर जिल्ह्यातील जनजागृती दरम्यान ग्रामीण भागातील नागरिकांनी कशाप्रकारे प्रतिसाद दिला आहे, सदरहू व्हॅनकरीता शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पालघर जिल्ह्यातील ०८ तालुक्यांमधील १५० गावांमध्ये एलईडी स्क्रीन असलेल्या व्हॅनव्दारे स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. स्वच्छतेचे संदेश लघुपटाव्दारे पाहण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांनी आणि शालेय विद्यार्थ्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

सदरहू व्हॅनसाठी रुपये १०.९४ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. खर्चाचे देयक अप्राप्त असल्याने सदरहू व्हॅनसाठी शासनाने अद्याप निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांविरुध्द विद्यापीठाकडून कारवाई करण्याबाबत

**(५३) * १६८० श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुसंख्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अपुरे शिक्षक, पायाभूत सुविधांचा अभाव इत्यादी त्रुटी आढळल्याने मुंबई विद्यापीठाकडून नेमलेल्या समितीने सन २०१७-२०१८ मध्ये ५३ महाविद्यालयांची पाहणी केली असता त्यापैकी १३ महाविद्यालयांमध्ये आवश्यक सुविधा असल्याचे निदर्शनास आले तर सन २०१८-२०१९ मध्ये पाहणी केलेल्या ५४ महाविद्यालयांपैकी ४० महाविद्यालयांमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रुटी आढळलेल्या उपरोक्त अभियांत्रिकी महाविद्यालयांविरुध्द विद्यापीठाने मागील दोन वर्षापासून कोणतीही कारवाई न केल्याने महाविद्यालये त्रुटी दूर करण्याकडे व महाविद्यालयांचा दर्जा वाढविण्याकडे दुर्लक्ष करीत असून सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या दोन वर्षात केलेल्या पाहणीत महाविद्यालयांमध्ये कोण-कोणत्या त्रुटी निदर्शनास आल्या,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी कार्यवाही करुन विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये यासाठी त्रुटी आढळलेल्या महाविद्यालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील बहुसंख्य अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अपुरे शिक्षक, पायाभूत सुविधांचा अभाव इत्यादी त्रुटी आढळल्याने मुंबई विद्यापीठाने स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली आहे.

या समितीने सन २०१७-२०१८ मध्ये पाहणी केलेल्या ५५ महाविद्यालयांपैकी ११ महाविद्यालयांमध्ये आवश्यक सुविधा असल्याचे निदर्शनास आले असून सन २०१८-२०१९ मध्ये पाहणी केलेल्या ५४ महाविद्यालयांपैकी ४० महाविद्यालयांमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) मुंबई विद्यापीठाकडून नेमलेल्या समितीने केलेल्या पाहणीत सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या दोन वर्षात आवश्यक सुविधा नसलेल्या महाविद्यालयांमध्ये मान्यताप्राप्त शिक्षक नियुक्ती व पायाभूत सुविधासंदर्भातील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.
(३) विद्यापीठाने सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना अनुपालन अहवाल विद्यापीठास सादर करण्याविषयी दिनांक १६ मार्च, २०१९ च्या पत्रान्वये तसेच दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ च्या ई-मेलव्दारे कळविले होते.

त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ करीता १२ तर शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करीता ११ त्रुटी पूर्ततेचे अहवाल विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. सदर प्राप्त अहवाल व अप्राप्त अहवाल याबाबतची माहिती येणाऱ्या विद्यापरिषदेपुढे कार्यवाहीसाठी ठेवण्यात येईल व विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक व प्राथमिकस्तरावर शिक्षण सुविधा देण्याबाबत

**(५४) * २०७३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील इयत्ता पहिली आणि दुसरीच्या सुमारे ३५ टक्के विद्यार्थ्यांना एकही अक्षर तसेच २५ टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना १ ते ९ अंक वाचता येत नसल्याचे 'असर २०१९' संस्थेच्या जाहिर झालेल्या अहवालातून दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार सदर शाळांचे शिक्षक, मुख्याध्यापक व इतर अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करुन नागपूरसह राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थांना पूर्व प्राथमिक व प्राथमिकस्तरावर शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या हेतुने शिक्षकांना निष्ठा या प्रशिक्षण कार्यक्रमातून प्रशिक्षित करण्यात येत आहे.

१. राज्यातील सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वी च्या गुणवत्ता विकासासाठी मराठी मुलभूत वाचन प्रशिक्षण इयत्ता १ ली ते ५ वी च्या सर्व शिक्षकांना देण्यात आले.

   प्रारंभिक भाषा विकास, समजपूर्वक वाचन व स्तर आधारित अध्ययन हे उपक्रम नियोजित आहेत.

२. गणित विषयाकरीता गणित संबोध प्रशिक्षण हे प्रशिक्षण इयत्ता १ ली ते ५ वी च्या सर्व शिक्षकांना देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रयोगशाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५५) * २३०० श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात ६५ हजार विविध ब्रॅण्डची औषधे विकली जात असताना औषध चाचणीमधील गुणवत्ता तपासणाऱ्या मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथील प्रयोगशाळेत कुशल मनुष्यबळाची उपलब्धता नसल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रक्ररणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार सर्वसामान्यांना गुणवत्तापूर्ण औषधे मिळण्याकरीता प्रत्यक्ष तपासणी केलेल्या औषधांची संख्या वाढविण्यासाठी राज्यातील मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथील प्रयोगशाळांतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे :** (१) राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या तीन प्रयोगशाळेसाठी १०३ तांत्रिक पदे मंजूर असून त्यापैकी ७६ पदे भरलेली आहेत व २७ पदे रिक्त आहेत.

(२) अन्न व औषध प्रशासनाच्या आकृतिबंधाचा आढावा घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. आकृतिबंधाच्या आढाव्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रयोगशाळातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर तथा इतर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती मिळण्याबाबत

**(५६) * ५७८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर तथा इतर शिक्षकेतर कर्मचारी यांना २४ वर्षाच्या दुसऱ्या कालबध्द पदोन्नती मिळण्याबाबत नागपूर उच्च न्यायालयाने याचिका क्र.६३२३/१८ व याचिका क्र.८४३९/१८ नुसार निकालाचा निर्णय याचिकाकर्त्यांच्या बाजूने दिनांक १५ जुलै, २०१९ रोजी देवूनही याचिकाकर्त्यांना सदर लाभ शिक्षण विभागाकडून मिळाला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राष्ट्रीय शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ शाखा, नागपूर यांनी शिक्षण उपसंचालक, नागपूर व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना दिनांक २६ जुलै, २०१९ रोजी निवेदन देवूनही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुसऱ्या कालबध्द पदोन्नतीचा लाभ व फरकाची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३३४/२०१८ मध्ये दिनांक ४/१०/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयात विधी व न्याय विभागाने दिलेल्या परवानगीनुसार पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. यानुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ६३२३/२०१८ व याचिका क्र. ८४३९/२०१८ मध्ये दिनांक १५/०७/२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरूध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एनपीएसधारक शिक्षकांच्या खात्यामध्ये शासनाचा हिस्सा जमा करणेबाबत

**(५७) * ८७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.कपिल पाटील, श्री.अंबादास दानवे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७३२ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची अंशदायी पेन्शन योजनेची खाती उघडण्यात आली असून त्यांच्या खात्यावर त्यांच्या व शासनाच्या हिश्श्याची देय होणारी १० टक्के रक्कम जमा करुन त्यांना भविष्य निर्वाह निधीच्या हिशोबाच्या पावत्या देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच डीसीपीएस योजनेचे एनपीएस योजनेमध्ये रूपांतरण करण्यात आले असून एनपीएस योजनेमध्ये शासनाकडून एनपीएसधारक शिक्षकांना १४ टक्के शासनाचा हिस्सा जमा करण्याचा शासन आदेश असून शासनाचा १४ टक्के हिस्सा एनपीएसधारक शिक्षकांच्या खात्यामध्ये जमा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंशदायी पेन्शन योजनेत येणाऱ्या अशा शिक्षक कर्मचाऱ्यांची खाती न उघडणे व त्यांची रक्कम जमा न होण्याबाबतची कारणे काय आहेत, तसेच एनपीएसधारक शिक्षकांच्या खात्यामध्ये शासनाचा १४ टक्के हिस्सा जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशतः खरे आहे.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा रकमेच्या पावत्या देण्यात येत आहेत.

(२) व (३) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमधील खातेधारकांची नावे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये (NPS) समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राचार्य व सहयोगी प्राध्यापक यांच्या ॲकॅडमीक स्तराबाबत

**(५८) * १२५५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकृषी विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयाच्या शिक्षकांना राज्य शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन आदेशान्वये ७ वा वेतन आयोग लागु केला असून दिनांक १० मे, २०१९ च्या शासन आदेशानुसार प्राचार्यांची वेतन निश्चिती ॲकॅडमीकस्तर १३-अ मध्ये केली तर प्राध्यापकांची वेतन निश्चिती ॲकॅडमीकस्तर १४ मध्ये केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहयोगी प्राध्यापक यांना तीन वर्ष सेवा व शैक्षणिक पात्रता पूर्ण केल्यावर प्राध्यापक म्हणून पदोन्नती मिळते तर प्राचार्य पदासाठी सहयोगी प्राध्यापक व १५ वर्षाचा अनुभव इत्यादी अटी असून सातवा वेतन आयोगात प्राचार्य पदास ॲकॅडमीकस्तर १३-अ केल्याने कार्यरत प्राचार्यांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बाबीत सुधारणा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दिनांक ०२/११/२०१७ रोजीच्या आदेशामधील तरतुदीप्रमाणे राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेण्या लागू केलेल्या आहेत. तसेच दिनांक १०/०५/२०१९ अन्वये सदरहू शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने विहित केलेली वेतनश्रेणी प्राचार्य पदास जशीच्या तशी लागू केलेली आहे.

तसेच शासनमान्य पदावर कार्यरत असलेल्या उमेदवाराची नियुक्ती प्राचार्य पदावर झाल्यास त्याचे वेतन संरक्षित होईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्राचार्यांवर अन्याय झाला आहे, असे म्हणणे उचित ठरणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत

**(५९) * ७२६ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती स्मिता वाघ, श्री.महादेव जानकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विनायकराव मेटे, श्री.विलास पोतनीस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच विद्यापीठामध्ये परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांच्या नोंदणीपासून पदवी देण्यापर्यंत सर्व कामे खाजगी संस्थांच्या मदतीने केली जात असून परीक्षासंबंधीची माहिती गोपनीय असल्याने कुशल मनुष्यबळ असतानाही एकाही विद्यापीठाकडे याबाबतची स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे विद्यापीठाचे कोट्यवधी रुपये खाजगी संस्थांना दिले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजेश अग्रवाल यांच्या समितीने सन २०११ मध्ये परीक्षेबाबत विविध शिफारशी केल्या असून त्यात विद्यापीठ कायद्यानुसार ४५ दिवसांच्या आत निकाल जाहीर करणे व इतर शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली नाही, तसेच दोन वर्षापूर्वी खाजगी संस्थेकडून मुंबई विद्यापीठाच्या संपूर्ण परीक्षा पध्दतीमध्ये बदल केल्याने निकालाची सहा महिने वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील अकृषी विद्यापीठातून दरवर्षी ३८ लाख विद्यार्थी परीक्षा देत असताना त्यांची परीक्षा घेणारी स्वतंत्र यंत्रणाच अस्तित्वात नसल्याने विद्यापीठांचा बहूतांश वेळ आणि श्रम परीक्षेच्या कामावर होत असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठे खाजगी संस्थांच्या हाती असतील तर परीक्षेचा तसेच इतर गोपनीय माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाल्याने विद्यापीठाकडे कुशल मनुष्यबळ असतानाही परीक्षासंबंधी गोपनीय बाब खाजगी संस्थाकडे देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विद्यापीठे खाजगी संस्थांकडे न देता स्वतंत्र यंत्रणा उभारुन राज्यातील सर्व विद्यापीठांसाठी 'सामाईक परीक्षा मंडळ' (कॉमन एक्झामिनेशन बोर्ड) स्थापन करण्याबाबत तसेच खाजगी संस्थांना विद्यापीठाचे कोटयवधी रुपये न देण्याबाबत कार्यवाही करुन राज्यातील विद्यापीठांचा कारभार पारदर्शी करण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील काही विद्यापीठांमध्ये आवश्यक संसाधने व कुशल तांत्रिक मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने सदर कामे खाजगी संस्थाकडे देण्यात येतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठामध्ये याकरीता स्वत:ची यंत्रणा अस्तित्वात आहे तर बऱ्याच विद्यापीठांमध्ये परीक्षेसंबंधीची कामे महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड या संस्थेमार्फत केली जातात.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) विद्यापीठाकडील परीक्षेची कामे जरी खाजगी संस्थाना देण्यात आली असली तरी, यासंदर्भात संबंधित संस्थांकडून तसे प्रमाणपत्र घेण्यात येते. सदर संस्थेवर विद्यापीठांचे सनियंत्रण असते. तसेच यासंदर्भात संबंधित संस्थेकडून तसेच विद्यापीठाकडून गोपनीयता राखली जाते.

(५) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या आणि त्यांच्या संलग्न महाविद्यालयाच्या गरजा भागविण्यासाठी एक वेब आधारीत सर्वकष पोर्टलच्या स्वरुपात सर्व अकृषी विद्यापीठांकरीता एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन प्रणाली राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १८ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते त्यांना पदवी मिळेपर्यंतच्या संपूर्ण जीवनचक्राचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या प्रणालीची अंमलबजावणी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (MahaIT) व्दारे सर्व विद्यापीठांमध्ये प्राथम्याने करण्यात येत आहे. या प्रणालीच्या परीक्षा मॉड्यूलचा काही विद्यापीठांनी स्वीकार केला आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील कुटुंबे शौचालयाविना असल्याबाबत

**(६०) * १३४० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याची सन २०१७ मध्ये शासनाने हागणदारीमुक्त जिल्ह्यांमध्ये घोषणा केली असून ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात नोंद झालेल्या २ लाख ६ हजार १५८ कुटुंब संख्येपैकी १ लाख ९६ हजार २२६ कुटुंबे वैयक्तिक शौचालयाचा वापर करीत असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीवरून माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २ हजार ८९६ कुटुंबांकडील शौचालये नादुरुस्त असून, उर्वरित ७ हजार ३६ कुटुंबांकडे शौचालये नसल्याचे जिल्हा परिषदेच्या आकडेवारीवरून माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असल्याने ठाणे जिल्ह्यास तत्कालीन शासनाने सन २०१७ मध्ये कोणत्या निकषांवर हागणदारीमुक्त घोषित केले होते,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार उर्वरित ७ हजार ३६ कुटुंबांसाठी शौचालये बांधण्याबाबत कार्यवाही करुन सदर माहितीमधील विसंगतीस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार जिल्ह्यात एकूण १,९३,०२४ कुटुंबे होती. त्यापैकी शौचालय असलेली १,०१,७९९ व शौचालय नसलेली ९१,२२५ कुटुंबे होती. त्यानुसार ९१,२२५ हे हागणदारीमुक्तीचे उद्दिष्ट होते. शौचालय नसलेल्या ९१,२२५ कुटुंबांना मार्च, २०१७ पर्यंत शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. मार्च, २०१७ अखेर हागणदारीमुक्तीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने ठाणे जिल्हा हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आला.

त्यानंतर केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ठाणे जिल्ह्यातील पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या व शौचालय नसलेल्या ४०२३ कुटुंबांना डिसेंबर, २०१९ पर्यंत वैयक्तिक शौचालये उपलब्ध करुन देण्यात आली. याप्रमाणे डिसेंबर, २०१९ अखेर ठाणे जिल्ह्यात वैयक्तिक शौचालयाचा वापर करणाऱ्या कुटुंबांची संख्या १,९७,०४७ आहे.

ठाणे जिल्ह्यातील ३०८९ नादुरुस्त शौचालये दुरुस्त करुन वापरायोग्य करण्यात आलेली आहेत.

ग्रामीण भागातील पायाभूत सर्वेक्षणाबाहेरील सर्व कुटुंबांना वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत केंद्र शासनाचे निर्देश प्राप्त झाल्याने त्यानुषंगाने वैयक्तिक शौचालय सुविधा नसलेल्या ६१९२ कुटुंबांची नोंद घेण्यात आली. त्यापैकी २५५५ कुटुंबांना वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून उर्वरित ३६३७ कुटुंबांना वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आयसीटी-आयटी शिक्षकांच्या पदांना सेवेत कायम करण्याबाबत

**(६१) * ९६७ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयसीटी-आयटी शिक्षकांना नाममात्र वेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयसीटी-आयटी अनुदानित मंजूर पदांना सेवेत कायम करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत

**(६२) * २३८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६८८ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रुपये ४३,००० ची सुधारीत वेतनश्रेणी देण्याबाबत व त्यांचे सेवानिवृत्तीचे वय विना अट ६५ वर्षे करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे शासनस्तरावर निर्णय झालेले नाहीत.

तथापि, प्राचार्य पदास सहाव्या वेतन आयोगामध्ये रुपये ३७४००-६७००० व ग्रेड वेतन रुपये १००००/- या वेतनश्रेणीमध्ये किमान रुपये ४३०००/- मध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी अशी मागणी असलेल्या याचिका मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या आहेत. त्यामधील याचिका क्र.६३४/२०१६ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी याचिकाकर्ते याची मागणी मान्य केलेली आहे. मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्तावाची तपासणी करून निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खाजगी स्लिपर-सीट आणि वातानुकूलित आराम बस परवानामुक्त करण्याबाबत

**(६३) * १६८२ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी स्लिपर-सीट आणि वातानुकूलित आराम बस परवानामुक्त करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून त्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने परिवहन आयुक्त आणि नागरिकांकडून

मागविलेल्या हरकतींबाबतचे पत्र राज्याच्या परिवहन विभागाला दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले असून ३० दिवसांच्या आत हरकती नोंदवाव्या लागणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवासी सुरक्षेच्यादृष्टीने लक्झरी बसवर नियंत्रण ठेवण्यासाठी परवान्याची आवश्यकता असताना केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार खाजगी आराम बसेसना परवान्यामधून सूट मिळाल्यास प्रवाश्यांची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्र शासनामार्फत प्राप्त झालेल्या पत्राव्दारे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब :** (१) सदर बाबत वस्तुस्थिती अशी आहे की, केंद्र शासनाने अधिसूचना जारी करण्यापूर्वी उक्त मुद्दयाबाबत ३० दिवसांच्या आत सूचना तसेच अभिप्राय देण्याबाबत दिनांक ०७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्यांना विनंती केली आहे. तथापि, सदर बाबत अद्याप केंद्र शासनाने अधिसूचना जारी केलेली नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी केंद्र शासनास सूचना व अभिप्राय सादर करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे व अंतिम अधिसूचना अद्याप जारी झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.